Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

**Special Issue 20 Vol. I**
**on**

## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श

## Indian Society & Ideology of Disability

**October 2019**

**Associate Editor**
Dr. Shivaji Wadchkar

**Guest Editor**
Principal Dr. V.D. Satpute

**Assistant Editor**
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

www.publishjournal.co.in

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue XX , Vol. I<br>Octomber 2019 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Index

1. अपंगत्व (दिव्यांग) : प्रतिबंधात्मक उपाय, उपचार आणि पुनर्वसनाचे साधने — १
   प्रा. डॉ. विलास घोडे
2. अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणात प्रशासनाची भूमिका — १८
   प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)
3. अपंगत्वः स्वरूप,प्रकार व यशस्वी व्यक्ती — 23
   प्रा. सखाराम बाबाराव कदम
4. मराठीतील अपंग साहित्य प्रवाह : अभिसरण आणि मूल्यभान — 26
   प्रा.अरविंद रा.जाधव
5. दिव्यांग व्यक्तीचे प्रकार : एक अभ्यास — 32
   प्रा. नवनाथ बंकट बडे,
6. विकलांग व्यक्तिंचे मराठी कादंबरीतून आलेले चित्रण — 36
   प्रा. देशमुख बिभीषण
7. अपंग व्यक्तींचे प्रकार आणि अपंगत्वाचे व्यवस्थापन — ४२
   प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब
8. दिव्यांगाचे पुनर्वसन एक सामाजिक आव्हान — ४६
   प्रा. गंगाधर चव्हाण
9. मानसिक विकलांगता — ४९
   डॉ. घोडके अरविंद अंबादास
10. दिव्यांग स्त्रियांची समाजिक स्थिती — 51
    प्रा.ज्ञानेश्वर किसान म्हात्रे
11. भारतीय समाजातील अपंगाची स्थिती — 57
    डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे
12. दिव्यांगासाठी शासनाच्या योजना — ६१
    प्रा. डॉ. एम.डी.कच्छवे
13. दिव्यांगासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना — 65
    प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार
14. यशस्वी अपंगत्व — 70
    प्रा. डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

# CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue XX , Vol. I<br>Octomber 2019 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

## अपंगत्व (दिव्यांग) : प्रतिबंधात्मक उपाय, उपचार आणि पुनर्वसनाचे साधने

**प्रा. डॉ. विलास घोडे**

बी.पी.नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर – २४

---

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेत संयुक्त कुटुंब संस्थाला महत्वाचे स्थान आहे. पूर्वी कुटुंबात मोठया प्रमाणात सुबत्ता आणि वडिलधाऱ्या मंडळीचा प्रभाव होता. संयुक्त कुटुंब पध्दतीमुळे कुटुंबातील अपंगांच्या समस्यांकडे बघण्याच्या दुष्टिकोन मदत करण्याच्या स्वरुपाने होता. त्यामुळे अपंगाच्या समस्या तीव्र स्वरुपात समोर आल्या नाहीत. समाज जीवनामध्ये आर्थिक आणि सामाजिक झालेल्या परिवर्तनामुळे पारंपारिक व्यवसाय आणि संयुक्त कुटुंब पध्दतीचा ऱ्हास झाला. समाजाच्या विविध क्षेत्रात झालेल्या परिवर्तनामुळे अपंगांच्या समस्या तीव्र स्वरुपात समोर आल्यात.

शरीराच्या एखाद्या अंगाची हानी होणे, शारीरिक किंवा मानसिक स्थितीमध्ये विकृती येणे ही घटना कोणत्याही व्यक्ती सोबत होणारी अत्यं दुर्भाग्यपूर्ण दुर्घटना आहे. सन १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने अपंगत्व व्यक्तींच्या अधिकारासंबंधी घोषणा करण्यात आली त्यात स्पष्ट म्हटले आहे, “अपंगत्वांच्या सामाजिक तसेच आर्थिक नियोजन सर्व स्तरांवर लक्ष देण्याचे अधिकार आहे.” १९८१ हे वर्ष आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष घोषित करण्यात आले. प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्यातील तिसऱ्या रविवारला जागतिक अपंग दिवस साजरा केला जातो. सन १९८६ मध्ये नवीन शिक्षण धोरणामध्ये अपंग बालकांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात आले. आणि त्यांच्या क्षमता व मर्यादानुसार शिक्षण व्यवथा उपलब्ध करण्याची तरतुद करण्यात आली.

शोध निबंधाची उद्द्दिष्टे:

- अपंगत्व मुलांच्या स्थितीचा अभ्यास व विश्लेषण करणे
- अपंगत्व मुलांसाठी प्रतिबंधनात्मक, उपचार पध्दतीचा अभ्यास करणे
- अपंगत्व मुलांकरिता पुनर्वसनात्मक साधनाचा अभ्यास करणे.

अध्ययन पध्दती:

प्रस्तुत शोधनिबंध द्वितीय सामुग्रीवर तयार करण्यात आलेला आहे. यासामुग्रीमध्ये विविध पुस्तके, ग्रंथ, मासिके, दैनिके, इंटरनेट,च्या साहाय्याने तथ्य संकलन करुन त्याचे विश्लेषण संशोधकाने केलेले आहे

Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139


भारतात अपंगाचे प्रमाण पाश्चिमात्य देशाच्या तुलनेत जास्त प्रमाणात आढळून येते. एका सर्व्हेनुसार जवळपास १० मिलियन व्यक्ती प्रती वर्ष विकलांगाच्या सूचीमध्ये प्रवेश करतात. सन २०११ च्या जनगणनानुसार खालीलप्रमाणे अपंगांची लोकसंख्या व टक्केवारी देण्यात आली आहे.

**Disabled Population & Percentage by Sex and ResidenceÂ India : 2001-11**

| Disabled Population & Percentage by Sex and Residence India, 2011 | | | |
|---|---|---|---|
| **Residence** | **Persons** | **Males** | **Females** |
| Total | 2,68,10,557(2.21%) | 1,49,86,202 (2.41%) | 1,18,24,355 (2.01%) |
| Rural | 1,86,31,921(2.24%) | 1,04,08,168 (2.43% ) | 82,23,753 (2.03%) |
| Urban | 81,78,636(2.17%) | 45,78,034(2.34% ) | 36,00,602 (1.98%) |

अपंगांचे प्रकार : पश्चात्य देशात अपंगांच्या समस्यांकडे विशेषत्वाने लक्ष दिल्या जाते. परंतु भारतात अपंगांच्या समस्यांकडे पूर्वी समाजातील दानशूर आणि धार्मिक लोकांना पुण्य मिळविण्यासाठी मदत केल्या जात होती. अलिकडे भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद केलेल्या मानवाधिकारामुळे अपंगाच्या कल्याणाकडे विशेष लक्ष दिल्या जात आहे. भारतात प्रामुख्याने शारिरिक अपंगत्व, मानसिक अपंगत्व, अंध अपंगत्व,आणि मुक बधिर अपंगत्व आढळून येतात. सध्या या प्रकारच्या अपंगत्व व्यक्तीना 'दिव्याग व्यक्ती 'असे म्हटल्या जात आहे.

- शारिरिक अंपगत्व : कुटुंबात काही मुले जन्मतः शारिरिक दोष घेऊन जन्माला येत असतात. परंतु काही बालक इतर प्रकारच्या दुर्घटनेमुळे त्याच्यामध्ये अपंगत्व आलेले असते. अशा बालकातील अपंगत्वामुळे सामान्य बालकाप्रमाणे व्यवहार करु शकत नाही. श्शरीराचा एक किंवा अधिक भाग संपूर्ण निकामी झाला आहे व त्यामुळे त्या भागाचा कमी प्रमाणात उपयोग करु शकणाऱ्या व्यक्तीस अपंग व्यक्ती म्हणता येईल.'

क्रो एवं क्रो के अनुसार ''एक व्यक्ति जिसको कोई ऐसा शारीरिक दोष होता है, जो किसी भी प्रकार से उसे सामान्य क्रियाओ में भाग लेने से रोकता है, अथवा असे समित रखता है, उसे हम शारीरिक न्यूनताग्रस्त या विकलांग व्यक्ति कह सकते है।''





Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139


- मानसिक अपंगत्वः मानसिक अपंगत्व हा आजार नाही, रोग नाही. ती शारीरिक त्रुटी आहे, कमतरता आहे, ही मानसिक अवस्था आहे. कावीळ वा टायफॉइड यांसारखे रोग २,४,६ महिने औषध घेऊन बरे होतात तसे मानसिक आजारही मुळ कारण समजल्यावर काही प्रमाणात बरे होऊ शकतात. पण मानसिक अपंगत्व ही शारीरिक कमतरता, वैद्यकीय उपचाराबरोबर वैशिष्टयपूर्ण शिक्षणाने थोडयाफार प्रमाणात कमी होऊ शकते. मानसिक अपंगत्व पूर्णपणे नष्ट होत नाही.

मंदबुध्दी बालक ;डमदजंससल तमजंतकमक बीपसकद्ध या बालकामध्ये सामान्य बालकामध्ये असलेल्या मानसिक योग्यतेपेक्षा कमी योग्यता असते. यांचा बुध्दयांक कमी असल्याने मानसिक शक्तीमध्ये न्यूनता आढळते. तसेच "ज्या बालकांच्या बुदध्यांक ७० किंवा त्यापेक्षा कमी असतो त्यांना मंदबुध्दी बालक म्हणतात."

- अंध अपंगत्व : भारतामध्ये अंध अपंगत्व असणाऱ्या मुलांची संख्या मोठया प्रमाणात आहे. काही बालके जन्मतः अंध असतात तर काही बालकांना अपघातामुळे अंधत्व येत असते. उत्तर प्रदेश, राजस्थान आणि पंजाब या राज्यात अंधत्वाचे प्रमाणे जास्त आहे. तर मोठया प्रमाणात पाऊस आणि प्रखर किरणांचा अभाव असल्यामुळे आसाम, बंगाल व चेन्नई मध्ये अंधत्वाचे प्रमाण कमी आहे. पुरुषाच्या तुलनेत स्त्रीयांमध्ये अंधत्वाचे प्रमाण जास्त आहे. ' ज्या व्यक्तीला तीन हात अंतरावरुन हाताची बोटे मोजता येत नाहीत तिला अंध व्यक्ती असे म्हणतात'.

- मूक बधिर अपंगत्व (बहिरेपणा) : मूक बधिर हा देखील एक शारीरिक दोष आहे. त्यामुळे बालकाच्या सर्वागिण विकासात अडथळे निर्माण होऊ शकते. मुलांना बहिरेपणा हे जन्मतःच असू शकते तर काही मुलांना जन्मानतंर सुध्दा येऊ शकते. भारतामध्ये मूक बधिर अपंगत्व स्त्री व पुरुषामध्ये आढळून येते. मूक बधिर अपंगत्वाचे प्रमाण उत्तर प्रदेशात गंगा, यमुना व शारदा नद्यांचे खोरे, हिमालयाच्या पूर्व भागात, आसामचा काही भाग व कच्छचा काही भागात मूक बधिर अपंगत्वाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे जम्मु व काश्मीरमध्ये ही मूक बधिर अपंगत्वाचे प्रमाण जास्त आहे. भारतात महिलांपेक्षा पुरुषांमध्ये मूक बधिर अपंगत्वाचे प्रमाण जास्त आहे. '' ज्या व्यक्तीचे कर्णेद्रिय अजिबात काम करु शकत नाही व पर्यायाने त्या व्यक्तीस ऐकू येत नाही अशा व्यक्तीस बहिरे म्हणता येईल''

भारतातील अपंगांचा विस्तारः सन १९८५ साली भारतीय राष्ट्रीय नमुना पाहणीद्वारे केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतात सुमारे १४ दशलक्ष लोकांना (भारतीय लोकसंख्येच्या १८ टक्के लोकांना) कोणत्यातरी प्रकारच्या अपंगत्वाने ग्रासलेले आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार


Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

भारतात अपंगाची २१.९० दशलक्ष लोकसंख्या होती. सध्या भारतामध्ये जवळपास १० कोटी अपंगाची लोकसंख्या आहे.

अपंगासाठी कार्य करणाऱ्या राष्ट्रीय संस्था : भारतात अपंगांसाठी राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या चार प्रमुख संस्था आहे. या सर्व संस्था केंद्र सरकारच्या कल्याणकारी मंत्रालयाच्या अंतर्गत कल्याणकारी कार्य करीत असतात.

१. अस्थिभंग अपंगांसाठी कार्यरत असलेली राष्ट्रीय संस्थाः सन १९७८ साली भारत सरकारच्या कल्याण मंत्रालय अंतर्गत ही संस्था स्थापन करण्यात आली. श्शारीरिक अपंग असलेल्या लोकांचा बहुसमावेश दृष्टिकोनातून पुनर्वसन करण्याचे कार्य आणि पुनर्वसनाच्या क्षेत्रात संशोधन व प्रशिक्षणाचे या संस्थातंर्गत केल्या जाते. शारिरिक अपंगांच्या कल्याणासाठी विशेष तज्ज्ञांची नेमणूक करुन नवीन तंत्रज्ञानाचा वापर पुनर्वसनाच्या कार्यात केला जातो.[8]

२. अंध अपंगांसाठी राष्ट्रीय संस्था: अंध अपंगासाठी कार्य करणारी ही एक राष्ट्रीय संस्था असून १ जानेवारी१९५० पासून अंधांसाठी प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. सन १९६७ साली या संस्थेतील विविध घटकांचे एकत्रीकरण करण्यात येऊन ही संस्था अंधाचे राष्ट्रीय केंद्र या नवीन नावाने कार्य करत आहे. या संस्थेचे कार्य खालील प्रमाणे आहे.

- अंधासाठी कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण
- अंधासंबंधी संशोधन व विकास कार्य
- अंधांना सेवा प्रदान करणे
- अंधाचे पालक, मालक आणि समुदाय यांच्यासाठी शिक्षण साहित्यांची निर्मिती करणे
- ब्रेल लिपीतील साहित्य, ध्वनीफिती तयार करण आणि अंधांना लागणाऱ्या इतर साहित्याची निर्मिती करणे.

३. मानसिक दृष्टीने अपंगांसाठी राष्ट्रीय संस्था : सन १९८४ साली भारत सरकारच्या कल्याण मंत्रालयातंर्गत या स्वायत्त संस्थेची स्थापना हैदाबाद करण्यात आली. मानसिक दृष्टया अपंगांसाठी कार्य करणारी प्रमुख संस्था असून खालीलप्रमाणे कार्य करीत आहे.

- मानसिक दृष्टया अपंगांच्या आरोग्य जपणुकीसाठी एखाद्या प्रतिकृतीची निर्मिती करणे.
- नवीन संशोधन प्रकल्पांचे आयोजन करणे.
- मानसिक अपंगांचा मानवी संसाधनांचा विकास करणे.
- मानसिक अपंगांसंबंधी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना मार्गदर्शन व सल्ला देणे.
- मानसिक अपंगांच्या जनगणनासाठी सहकार्य करणे



**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

४. मुक बधिरांसाठी अलियावर जंग राष्ट्रीय संस्था: महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल अलियावर जंग यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुक बधिर अपंगांसाठी ९ ऑगस्ट १९८३ साली मुंबई येथे या संस्थेची स्थापना करण्यात आली. ही संस्था भारत सरकारच्या कल्याण मंत्रालयातंर्गत कार्य करीत असते. या संस्थेद्वारे मुक बधिरांच्या पुनर्वसनासंबंधी कार्य केल्या जाते. तसेच विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन, नियतकालिके प्रकाशित करुन जनजागृतीचे कार्य केल्या जाते. या संस्थामार्फत आणि प्रादेशिक केंद्रातंर्गत विविध संशोधन प्रकल्पाचे आणि शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करीत असतात.

अपंगांकरिता प्रतिबंधात्मक साधनेः समाजातील प्रत्येक कुटुंबाला जन्माला येणारे बालक सुदृढ असण्याची इच्छा असते. कोणत्यातरी कारणामुळे अपंग बालक जन्माला येण्याची शक्यता असते. परंतु अपंगत्व दाम्पत्यांनी बाळाला जन्म देण्यापूर्वी काळजी घेणे आवश्यक आहे. जन्माला येणारे बाळ जर व्यगंत्व असेल त्यासंबंधी खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाय करता येतात.

गर्भनिरोधक साधनाचा उपयोग: गर्भनिरोधक साधनाचा वापर करतांना मानसिक दृष्टया अपंग स्त्री—पुरुषांनी गर्भनिरोधक साधनाचा वापर करुन गर्भधारणा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच अपंगत्व निर्माण होण्यामध्ये अनुवांशिक घटक महत्वपूर्ण असल्यामुळे अशा दाम्पत्यांना अपंगत्व असलेले बालक जन्माला येण्याची शक्यता जास्त असते. अशावेळी उपलब्ध असलेल्या गर्भनिरोधक साधनाचा वापर करुन अपंग बालक जन्माला येण्याचे प्रमाण कमी करता येते.

**गर्भपात:** गर्भपात करणे कायद्याच्या दृष्टिने गुन्हा आहे परंतु अपंग बालक जन्माला येण्याची लक्षणे असतील तर कायदेशीर मदत घेऊन गर्भपात करणे हिताचे असते. त्यामुळे जन्माला येणाऱ्या बालकाला, आई—वडीलांना आणि कुटुंबातील सदस्यांना भविष्यात त्रास होणार नाही.

वैद्यकिय मदतः अपंग बालक जन्माला येण्याची अनेक कारणे असू शकतात. परंतु काही संसर्गजन्य आजार आणि काही इतर आजारामुळे दोष निर्माण झाल्यास वैद्यकिय उपचाराद्वारे प्रतिबंध केला जाऊ शकतो. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार बालकांची वैद्यकिय तपासणी करुन आई—वडिलांनी मुलांची काळजी घेतली तर बालपणातील दोष योग्य उपचारामुळे कमी होण्याचे प्रमाण जास्त असते.

**हार्मोन्स संबंधी उपचार:** अपंग मुलांच्या मेंदुतील ग्रंथीच्या स्त्रावमध्ये बदल झालेला असतो. मुलांच्या सुदृढ शारीरिक वाढीसाठी हार्मोन्स तपासणी डॉक्टरकडून करुन घेणे गरजेचे असते त्यासंबंधी योग्य उपचार केल्यामुळे अपंग मुलांचे आरोग्य संतुलित राहण्यास मदत होते.

Special Issue XX , Vol. I October 2019 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

संतुलित सकस आहार: शरीराच्या विकासासाठी संतुलित आहाराची गरज असते. आई–वडीलांनी संतुलित आहार घेऊन आरोग्याची काळजी घेतली तर अपंग बालक जन्माला येण्याची शक्यता कमी असते. स्त्री गर्भधारणा काळात सकस व अपुरा आहार घेतल्यामुळे गर्भाचा पूर्ण विकास होत नाही त्यामुळे निर्धारित वेळेपूर्वी बाळ जन्माला येते. अशावेळी मुलांचा पूर्णपणे विकास न झाल्यामुळे अपंग मुल जन्मा येण्याची शक्यता असते.

संशोधन कार्य : मतिमंद बालकांच्या सर्वांगिक विकासासाठी संशोधनकार्य होणे गरजेचे आहे. संशोधन कार्यामुळे त्यांच्या समस्यासंबंधी नवीन नवीन उपचार शोधून काढल्या जाऊ शकतात आणि नवीन साधनांची, उपक्रमाची निर्मिती केल्या जाऊ शकते. अशा नवीन संशोधनांची माहिती पालकांना दिल्यास मुलांचे संगोपन आणि पुनर्वसन करण्यासाठी मदत होते.

**अपंगांकरिता उपचार पध्दती:** अपंग मुलांच्या विविध समस्या असतात त्यांना शिक्षणाबरोबर इतरही उपचारांची गरज भासत असते. त्यांच्या समस्या हया जटील स्वरुपाच्या आणि काही मुले एकापेक्षा जास्त समस्यांने बाधित असतात. अशावेळी अनेक तज्ज्ञांच्या उपचार पध्दतीमुळे अपंग मुलांच्या समस्या सोडविल्या जाऊ शकतात.

**मनोचिकित्सक/मानसशास्त्रज्ञ** : काही अपंग मुलांची एकाग्रता आणि बुध्दिमत्ता कमी असते. त्यांची मानसिक वाढ शारीरिक वाढी पेक्षा कमी झाल्यामुळे येणाऱ्या समस्यांमधून मार्ग काढणे व त्या बरोबर पालकांना मार्गदर्शन करणे ही महत्वाची कार्य मनोचिकित्सक किंवा मानसशास्त्रज्ञ करीत असतात. उपलब्ध असलेल्या चाचण्यांच्या आधारे मुलांचे बुध्दी मापन करुन त्याची सद्यस्थिती व बुध्दीची क्षमता यांचे मुल्यमापन करुन बुध्दीगुणांकाची पातळी निश्चित करण्याचे कार्य मानसशास्त्रज्ञ करतात. मुलांमधील अतिचंचल कमी करणे, मुलांची एकाग्रता वाढविणे आणि बुध्दीची क्षमता ओळखून त्यांना शिक्षणासाठी तयार करणे यामध्ये मानसशास्त्रज्ञांची महत्वाची भूमिका असते. पालक बरोबरच कुटुंबातील इतर व्यक्तींनी या विशेष मुलांचे संगोपन आणि पुनर्वसन कश्याप्रकारे याविषयी मनोचिकित्सक मार्गदर्शन करीत असतो. त्यांमुळे बालकांच्या कुटुंबातील ताण–तणावाचे वातावरण कमी होते.

वाचा उपचार तज्ज्ञ: अपंग मुलांना संवादामधील अडचणी, अस्पष्ट उच्चार, श्रवण दोष इत्यादी समस्या असतात. अपंग मुलांच्या संवादासंबंधी येणाऱ्या समस्या वाचा उपचार तज्ज्ञांच्याद्वारे सोडविल्या जाऊ शकतात.

**भौतिकोपचार तज्ज्ञ:** भौतिकोपचार म्हणजे सांधे व स्नायूच्या हालचालीतील दोष नाहीसा करण्यासाठी शिस्तबध्द पध्दतीने दिलेला व्यायाम प्रकार होय. काही अपंग मुलांना शारीरिक दोष असतात. उदा. चालता येत नाही, हाताला जोर नसतो, हाताची पकड चांगली नसते

Late. Ramesh Warpudkar





Special Issue XX , Vol. I October 2019 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

इत्यादी शारीरिक समस्या भौतिकोपचार तज्ज्ञांच्या सहाय्याने योग्य व्यायामाची निवड करुन सोडविल्या जाऊ शकतात. काही बाबतीत शस्त्रक्रिया केल्या जाऊ शकतात.

व्यवसाय उपचार तज्ज्ञ: अपंग मुलांना सतत कार्यरत ठेवणे, विविध प्रकारच्या खेळांनी आकर्षित करुन हालचाल करण्यास प्रवृत्त करणे हे व्यवसाय उपचार तज्ज्ञांचे महत्वाचे कार्य आहे. मेंदू मध्ये विविध संवेदना केंद्रे असतात त्यांचा परस्परांशी संबंध असतो. हया संबंधाचा ज्याप्रमाणे विकास होतो त्याचप्रमाणे बुध्दीचाही विकास होतो. अपंग मुलांमधील क्रियाशिलतेनुसार व्यवसायाची निवड, मुलांची कामामधील रुची, गती इत्यादीच्या आधारे व्यवसाय उपचार तज्ज्ञ मुलांना व्यवसाय निवडण्यास मदत करतो.

**संगीत उपचार:** अपंग मुलांना संगीताची आवड असते व ती आवड लक्षात घेऊन संगीत उपचाराचा वापर त्यांच्यातील सुधारणेसाठी केला जातो. अस्थिरता, अतिचंचलता कमी करुन एकाग्रता वाढविण्यासाठी संगीताचा उपयोग केला जातो. विविध रोगांवर वेगवेगळया संगीताचा सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येते. अपंग मुलांच्या शिक्षणातही संगीत उपचाराचा वापर करुन त्यांच्यामधील वर्तन समस्यांवर नियंत्रण ठेवता येते. आत्ममग्न मुलांमध्ये संभाषण क्षमता वाढविण्यासाठी संगीत उपचार पध्दतीचा उपयोग केला जातो.

क्रिडा उपचार: अपंग मुलांना खेळाच्या माध्यमातून आपल्या मनातील भावना मोकळेपणाने व्यक्त करु शकतात. आणि त्यातूनच त्यांच्यावर मानसोपचार करणे शक्य होते. मैदानी खेळांमुळे मुलांमधील जास्तीची शारीरिक उर्जा वापरली जाते. क्रिडा उपचार पध्दतीमुळे त्यांच्या वर्तन समस्यांमध्ये सुधारणा होण्यास मदत होते. दृकश्राव्य पध्दत: काही अपंग मुलांमध्ये कल्पनाशक्तीचा अभाव असतो. पुनर्रचनेनेही काही गोष्टी स्मरणशक्तीच्या अभावामुळे त्यांच्या पर्यंत पोहोचत नाहीत. अशा प्रसंगी दृकश्राव्य माध्यमातून त्यांना त्या गोष्टीचे लवकर आकलन होते. व्यावसायिक समाजकार्यकर्ता: व्यावसायिक समाजकार्यकर्ता हा एक प्रशिक्षित समाजकार्यकर्ता असतो. त्याला समाजातील समस्या, गरजा, सामाजिक जीवन, सामाजिक आंतरक्रिया, व्यक्तीच्या वर्तनविषयक समस्या, समाजाचा दृष्टिकोन इत्यादी घटकासंबंधी ज्ञान व अनुभव असतो.

**अपंग(दिव्यांग) बालकांकरिता पुनर्वसनाचे साधन:**

**कौटुंबिक प्रशिक्षण:** मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्यामुळे सामाजिक रितीरिवाजाप्रमाणे जीवन जगण्यासाठी संस्कार आणि संस्कृतीची गरज असते आणि व्यक्तीचे योग्य सामाजिकीकरण होणे आवश्यक असते. परंतु काही अपंग बालकासंबंधी संस्कार आणि संस्कृतीचा अभाव असतो. अश्या या बालकांना संस्कार आणि संस्कृतीचे प्रशिक्षण देऊन समाजशील बालक घडविण्याचा प्रयत्न केला जातो.

Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

**व्यावसायिक प्रशिक्षण :** आजच्या बालकांची भविष्यातील उदरनिर्वाहाची गरज महत्वाची आहे. अपंग बालकांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न फारच गंभीर असतो. त्यांच्या भविष्याचा विचार लक्षात घेऊन त्यांना त्यांच्या बुध्दी व शारीरिक क्षमतेप्रमाणे व्यावसायिक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

**कार्यशाळेचा उपयोग:** अपंग बालकांना प्रशिक्षणासाठी कार्यशाळेची व्यवस्था केली पाहिजे. कार्यशाळेमध्ये अपंग व्यक्तींना योग्य पध्दतीने आणि त्यांच्या बौध्दिक आणि शारिरिक क्षमता लक्षात घेऊन त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते. कार्यशाळेमध्ये अनेक मुले असल्यामुळे एकमेकांच्या सहवासातून प्रेरणा, उत्साह आणि आत्मविश्वास मुलांमध्ये निर्माण होतो.

**पालकांचे संघटन:** अपंग मुलांचे संगोपन करणे अत्यंत आव्हानात्मक कार्य आहे. पालकांमध्ये संयम, सहनशिलता आणि जबाबदारी या गुणवैशिष्टयाची गरज असते. अपंग मुलांच्या पालकांचे संघटन असल्यास त्यांच्या मुलांच्या गरजा, समस्या इतर बाबतीतही चर्चा करण्यासाठी व्यासपिठ तयार होते. तसेच त्यांच्यावरील होणाऱ्या अन्यायाविरुध्द संघटित लढा देणे शक्य होते. पालकांच्या सुख व दुःखाविषयी चर्चा होतात. पालकांच्या संघटनेला मुलांच्या विकासासंबंधी नवीन माहिती व उपक्रमांची माहिती देणे शक्य होते. थोडक्यात मुलांच्या विकासाच्या दृष्टिने पालकांचे संघटन अतिशय महत्वाचे आहे.

**पृथ्यक्करण शिक्षण प्रणाली:** काही अपंग मुलांना सामान्य मुलांपासून वेगळे करुन त्यांना शिक्षण व प्रशिक्षण दिले पाहिजे. मानसिक अपंग मुलांच्या बुध्दयांक कमी असल्यामुळे सामान्य मुलांप्रमाणे शिक्षण व कार्य करु शकत नाही. अशावेळी त्यांच्या न्युनगंडाची भावना निर्माण होते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होऊन समस्या निर्माण होतात.

**पालकांचे विशेष लक्ष:** पालक सामान्य बालकांचे नेहमी प्रशंसा आणि कौतुक करीत असतात. कुटुंबातील कामामध्ये सामान्य मुलांना सहभागी करुन घेतात परंतु असामान्य बालकांना नेहमीच दुर्लक्ष केल्या जाते. त्यामुळे बालकांमध्ये द्वेष, मत्सर आणि न्युनगंडाची भावना निर्माण होते, अपंग बालकांच्या व्यक्तिमत्व विकासातील घटकांना संधी मिळत नाही. पालकांनी सामान्य बालकाप्रमाणे मतिमंद बालकांच्या समस्या व गरजांवर लक्ष दिले पाहिजे आणि त्यांना पुरेसा वेळ देऊन भावनिक सहायता केली पाहिजे.

**कल्याणकारी सेवा आणि कायदे:** अपंग बालकांचे पुनर्वसनात्मक कार्य आव्हानात्मक आहे. अपंग मुलांची गरज सुध्दा आहे. केंद्र सरकार, राज्य शासन ,स्वयंसेवी संस्था यांनी विविध उपक्रम व कल्याणकारी योजना राबवून अपंग मुलांचे पुनर्वसन केल्या जात आहे. तसेच अपंग संरक्षणात्मक दृष्टया कायद्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.





Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
October 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

**सारांश:** दिव्यांगामध्ये शारीरिक अपंगत्व, मानसिक अपंगत्व, अंधत्व, आणि मुकबधिर अपंगत्व आढळून येतात. यामधून मानसिक अपंगत्व प्रकारातील मुलांचे संगोपन आणि पुनर्वसन कार्य अतिशय आव्हानात्मक आहे. शासनाच्या अपंगांकरिता अनेक कल्याणकारी योजना आणि शासकिय नोकरीमध्ये आरक्षण असुन सुध्दा अपंग मुले योजनांचा लाभ घेऊ शकत नाही. स्वतःच्या अधिकारासंबंधी व हक्क लढा देऊ शकत नाही. अनेक अन्याय व अत्याचाराला त्यांना बळी पडाव लागत असत. अपंग मुलांच्या पालकांना मुलांचे संगोपन करतांना वेळोवेळी अनेक समस्यांना सामना करावा लागता. अशा पालकांना मुलांच्या भविष्याची चिंता लागलेली असते. अशा प्रकारे समाजातील वंचित व दुर्लक्षित अपंगत्व मुलांच्या पुनर्वसन कार्यामध्ये शासन, स्वयंसेवी संस्था, संशोधक, समाजातील परोपकारी व्यक्ती यांचे सहकार्य मिळल्याशिवाय दिव्यांग मुलांचे उत्थान शक्य होणार नाही.

**संदर्भग्रंथ सूची:**

ओक, वैजयंती (१९९७)“मतिमंद मुलांचे शिक्षण”, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर.

आनन्द, विनती, “मनोविकृती—विज्ञान”, दिल्ली : मोतीलाल बनारसीदास.

बर्वे, बी. एन., “मानसशास्त्रीय चाचण्या”, नागपूर : विद्या प्रकाशन, रुईकर रोड, महाल.

बापट, विद्या वि. (१९९५) “सुजाण पालकत्व”, पुणे : नितीन प्रकाशन.

Chainai, M. L. (1971) "Rehabilitation of Physically Handicapped", Bombay : Popular Prakashan.

देवरुखकर, संध्या (फेब्रु. १९९२) “स्वीकार मतिमंदांचा”, पुणे : श्री विद्या प्रकाशन, २५०, शशनिवार पेठ.

कुलकर्णी पी. के (२००८) आरोग्य आणि समाज, पुणे: डायमंड प्रकाशन

पाटे सुमन(१९९१) सामाजिक समस्या, नागपूर: विद्या प्रकाशन

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani